१६) इमारतीचे सांडपाणी महानगर पालिकेच्या गटारीत सोडावे. गटार नसल्यास मंजूर नकाशाप्रमाणे अथवा स्वतःच्या जागेत साका पिटा बांधुन सांडपाण्याचा निचरा करण्याची सोय करावी. त्या व्यतिरीक्त होणाऱ्या कारवाईस अर्जदार जबाबदार राहतील.

१७) [ चेंबरात जाणे- येणे करीता महानगरपालिकेच्या गटारीवर ढापा टाकावा. ढापा गटारी इतका रुंद ३ फुट लांब व रस्त्याच्या बरोबर असावा.

१८) संडासाचे बांधकाम करते वेळी १ व २ नंबराच्या टाकीवर ४ इंची व्यासाचे २ वेन्ट पाईप बसवावी. त्यावर वरच्या बाजुस दोन टोप्या बसविण्यात. मात्र हे वेन्ट पाईप जवळील इमारतीच्या उंचीपेक्षा ५ फुट असावेत.

१९) संडासापासून कमीत कमी ३० फुटाच्या अंतरावर आड अगर विहीर नसावी.

२०) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६३ अन्वये सदर घराचे बांधकाम पूर्ण झाल्यापासून एक महिन्याच्या आत बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र (Completion Certificate) मिळणेसाठी महानगर पालिकेकडे अर्ज करावा. सदर प्रमाणपत्र मिळल्यानंतर इमारतीचा वापर सुरू करावा. परवानगी शिवाय इमारतीचा वापर केल्याचे आढळून आल्यास उपरोक्त कलमान्वये तुमच्या विरूध्द कारवाई करण्यात येईल.

२१) विकास परवानगी / बांधकाम परवानगी मिळाल्याबरोबर भुखंड धारकाने / जमीन मालकाने / विकसन कर्त्याने संबंधीत भुखंडावर / जमीनीवर खालीलप्रमाणे सविस्तर तपशील असलेला फलक लावणे बंधनकारक राहील.

अ) मालक / विकसन कर्ता / वास्तू विशारद
आणि कंत्राटदार यांचे नाव व पत्ता

ब) संबंधीत भुखंडाचा सर्व्हेनंबर / सि. स. नं.
वार्ड नं. व भुखंडाचे चारही हद्दीचे सविस्तर तपशील व क्षेत्र

क) महानगरपालिकेने मंजुरी दिलेल्या परवानगीचा नंबर व दिनांक

ड) मंजूर नकाशा नुसार नमुद केलेले बांधकामचे अनुज्ञेय क्षेत्र

इ) एकूण रहिवासी वापरासाठीच्या सदनिकांची संख्या व वाणिज्य
वापरासाठीच्या दुकानांची/गाळ्यांची संख्या प्रत्येक गाळ्यांचे / सदनिकांचे क्षेत्रसहीत.

फ) मंजूर नकाशाची प्रत पाहण्यासाठी ज्या ठिकाणी उपलब्ध होऊ
शकेल अशा ठिकाणचा सविस्तर पत्ता :

२२) जमीन मालकाने / विकसनकर्त्याने वरील प्रमाणे अट क्र. १ मधील (अ ते फ) तपशील कुठल्याही दोन स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील. स्थानिक वृत्तपत्रांपैकी एक वृत्तपत्र प्रादेशिक भाषेतील असावे. व त्याच्या दोन प्रति कार्यालया कडे सादर कराव्यात.

२३) नियोजित बांधकाम भुकंप रोधक करण्याचे दृष्टीने भारतीय मानक संस्थेने निर्देशित केलेल्या मानकानुसार बांधकाम करणे बंधन कारक राहील.

२४) बांधकाम नकाशावर दर्शविलेल्या नुसार जल:संधारणची व्यवस्था करणे बंधन कारक राहील. त्याशिवाय इमारत भोगवटा प्रमाण पत्र मिळणार नाही.

२५) दिनांक २७/०२/२००४ चे शासन निर्णया नुसार महानगरपालिका क्षेत्रातील बांधकामात फ्लॉय ॲश व फ्लय ॲश आधारित साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

२६) रूफ टॉप रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे बंधन कारक आहे.

२७) सौर ऊर्जेचा वापर प्राधान्याने करावा

आयुक्त
धुळे महानगर पालिका, धुळे

प्रत :

१) उपायुक्त (कर)
धुळे महानगर पालिका, धुळे.